राज्यात बिगर आदिवासी क्षेत्रात अति तीव्र कुपोषित बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना सुरु करणे या योजनेसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित केलेला निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१९/प्र.क्र.११४ /का.५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुर चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३१ जुलै, २०१९

वाचा :- (१) शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१६/प्रक्र ३३१/का-५, दि.२६.९.२०१७
(२) वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/ अर्थ-३, दिनांक ८ जुलै,२०१९.

प्रस्तावना :-

राज्यातील कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी बिगर आदिवासी क्षेत्रातील अति तीव्र कुपोषित बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) स्थापन करण्याची योजना उपरोक्त वाचा क्रमांक (१) च्या दिनांक २६.९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजना राबविण्याकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता लागणा-या खर्चासाठी रु. २४,०७,४०,०००/- इतक्या रकमेची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. सदर निधीपैकी माहे डिसेंबर,२०१९ च्या खर्चाकरीता वित्त विभागाने उपरोक्त वाचा क्रमांक (२) नुसार घालून दिलेल्या ६०% निधी वितरणाच्या मर्यादेत या योजनेकरीता निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राज्यात बिगर आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडयांमध्ये ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) स्थापन करण्यात आलेल्या योजनेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मागणी क्रमांक एक्स-१, मुख्य लेखाशिर्ष २२३६, (०९)अतितीव्र कुपोषित बालकांवर उपचार, (०९) (०१) ग्राम बाल विकास केंद्र (कार्यक्रम), सांकेतांक २२३६१९९२ याखाली अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रु.२४,०७,४०,०००/- इतक्या तरदुदीपैकी वित्त विभागाने घालून दिलेल्या मर्यादेनुसार प्रथम नऊमाही करीता (माहे एप्रिल,२०१९ ते डिसेंबर २०१९ अखेर) अर्थसंकल्पीत निधीच्या ६०% इतका निधी रु.१४,४४,४४,०००/- (अक्षरी रुपये चौदा कोटी, चव्वेचाळीस लक्ष, चव्वेचाळीस हजार फक्त) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांना वितरीत करण्यास व खर्च करण्यास शासन मान्यता देत आहे.

या योजनेकरीता आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांना वितरीत व खर्च करण्यास उपलब्ध करुन देण्यात आलेला रु.१४,४४,४४,०००/-(अक्षरी रुपये चौदा कोटी, चव्वेचाळीस लक्ष, चव्वेचाळीस हजार फक्त) इतका निधी शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार खर्च करण्याची दक्षता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी घ्यावी व सदर निधी खर्च झाल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७३११२२९४३५२३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing
Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.07.31 12:35:15 +05'30'

(ला. रा. गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन,मुंबई.
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य, मंत्रालय, मुंबई-३२
४) सचिव (महिला व बालविकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
७) सर्व जिल्हाधिकारी.
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
९) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास.
१०) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
११) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी).
१२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
१३) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद.
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१७) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४७२)/ वित्त विभाग (व्यय-६) मंत्रालय, मुंबई
१८) कक्ष अधिकारी (का-४) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

त्यांना कळविण्यात येते की, ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) (कार्यक्रम) या योजनेच्या सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील खर्चाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेला रु.१४,४४,४४,०००/-(अक्षरी रुपये चौदा कोटी, चव्वेचाळीस लक्ष, चव्वेचाळीस हजार फक्त) इतका निधी आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना BDS प्रणालीवर वितरीत करावा.

१९) निवड नस्ती (कार्यासन-५).